# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २२/०९/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१२) इतिवृत्त**

**शुक्रवार** दिनांक **२२ सप्टेंबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
8. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
9. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
10. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
11. श्री. मो. जावेद मो. इसाक
12. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री. हिम्मतराव दाभाडे : आजच्या सभेला मा.आयुक्त तसेच दोन्ही उपआयुक्त उपस्थित नाहीत. सभा आयोजित केली याची माहिती मा.आयुक्तांना दिलेली नव्हती का?

श्री. मुजीब खान : हे शहर ऐतिहासीक म्हणून ओळखले जते. निवडून येवून १६ महिने झाले विकास कामे करण्या संदर्भात सभागृहात सतत मागणी करीत आहोत. परंतू कार्यवाही होत नाही. सभेला मा.आयुक्त, दोन्ही उपआयुक्त उपस्थित नाहीत. शहरातील नागरीकांचे प्रश्न, जकात संदर्भात खूलासा घेणे अपेक्षीत आहे. वारंवार अधिकारी अनुपस्थित असतात. जेपर्यत मा.आयुक्त येत नाहीत तो पर्यत सभा तहकूब करावी.

मा. सभापती : अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते आहे.

(वेळ ११.४५ वाजता सभा तहकूब पून्हा १२.१५ वाजता सभेला सुरूवात)

श्री.मुजीब खान : सभेला दोन्ही उपआयुक्त नाहीत, गेल्या पधंरा दिवसापासून कार्यालयात अधिकारी भेटत नाहीत. त्यामुळे मा.आयुक्ताकडे जवे लागते.अधिकारी कार्यालयात भेटत नसतील तर आम जनतेची कामे होतील का? यात सुधारणा होणे अपेक्षीत आहे. जकात नाक्यावर ६.९.२००६ रोजी एक गाडी अडवून ठेवली मी स्वत: त्या ठिकाणी जवून माहिती घेतली असता ट्राफिक जस्त होत होती म्हणून कार्यरत असेलेले एका सैनिकाने गाड्या पुढे

घेण्यास सांगितले. गाडी पुढे उभी केल्यामुळे नाक्यावरील एका कर्मचाऱ्याने सेन्ट्रल नाक्यावर जकात द्यावी म्हणून अडवणूक केली. संबधीत व्यक्ती प्रत्येक महिण्याला शहरात माल घेवून येतात. केंव्हाही जकात चोरी केलेली नाही. याची चौकशी करण्यास मा.आयुक्तांनी यापूर्वी आदेशीत केले होते. सेन्ट्रल नाक्यावर गेल्यावर त्या व्यक्तीची गाडी अडवून ठेवली जकात भरून घेत नव्हते. त्या व्यक्तीकडे २५ लक्षची मागणी केली. २ दिवसानंतर १० लक्षची मागणी केली. आठ दिवसानंतर ५ लक्षची मागणी केली. संबधीत गाडी मालक महानगरपालिकेत अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी आले असता कोणीही भेटण्यास तयार नाही. सदरील व्यक्ती गरीब असून त्याचेवर उपासमारीची पाळी आलेली आहे. संबधीत व्यक्तीची मी मा.महापौराशी भेट घालून दिली व सर्व घडलेला प्रकार निदर्शनास आणून दिला. त्यावर मा. महापौर यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना बोलवून नाक्यावर पाठविले व अधिकारी यांनी आतमध्ये जवून संबधीताशी चर्चा केली तडजेड करावी, असे संबधीत व्यक्तीचे म्हणणे आहे असे म्हटले. १६ दिवसापासून संबधीत व्यक्तीची गाडी विनाकारण अडवून ठेवली. आर्थिक गैरप्रकार होत होते व नागरीकांना काही प्रमाणात सवलत मिळेल या हेतूने खाजगीकरण केले. परंतू शहरातील नागरीकांना खाजगी अभिकर्त्याकडून त्रास दिला जत आहे. नाक्यावर अनुचीत प्रकार घडत आहेत. वाद करून लोखंडी सळईने पाय तोडला. त्या बदल्यात १० लक्ष रूपये देतो म्हणून सांगितले. एक वेळेस ठेकेदारास नोटीस दिली. जेष्ठ व प्रतिष्ठित नागरीकांना संबधीत ठेकेदार सतावतो म्हणून मी मा.आयुक्ताकडे तक्रार केली होती. अनेक वेळा ठेकेदारासंबधी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. शहरातील नागरीकांवर अन्याय होवू नये ही अपेक्षा ठेवून जकातीचे खाजगीकरण केलेले होते. प्रत्येक नाक्यावर संबधीत ठेकेदार, कर्मचारी गुंडागर्दी करीत आहे. आजच्या बैठकीत या संबधी ठोस निर्णय घ्यावा, हे वेळीच बंद झाले नाही तर त्यांना नागरीक धडा शिकवतील. जकातीचे खाजगीकरण रद्द करावे महानगरपालिकेनेच वसूली करावी. शहरातील नागरीकांचे प्रेम आपल्याला महत्वाचे आहे, पैसा महत्वाचा नाही. दोन दिवसात ही परीस्थिती बदलली नाही तर आम्ही सर्वपक्षीय सदस्य एकत्र येवून यास विरोध करू व याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी. १० रू.ची वस्तू त्या बदल्यात १०००/-रूपयाची मागणी करीत आहे. नियमानुसार संबधीत व्यक्ती जकात भरण्यास तयार आहे. संबधीताकडून गाडीचे कागद तसेच बिल घेतले व कोण गाडी सोडण्यास येतो त्यांना घेवून ये म्हणून धमकी देण्यात आली. जबाब घेण्यास तयार असेल तर संबधीत व्यक्ती बाहेर उभे आहे. संबधीताची गाडी मागिल १६ दिवसापासून अडकून ठेवली आहे तो व्यक्ती गरीब आहे कुटूंबात चार पाच व्यक्ती पोट भरतात त्यास १६ दिवसाचे गाडी भाडे देण्यात यावे. संबधीत ठेकेदारास नोटीस द्यावी जकात खाजगीकरण रद्द करावे महापालिकेने वसूली करावी किंवा पुन्हा टेंडर काढण्यात यावे. यापूढे काही घटना घडल्यास त्याची जबाबदारी पदाधिकारी, प्रशासनावर येईल.

मा. सभापती : या संदर्भात प्रशासनाची भूमिका काय आहे खुलासा करावा.

मा.आयुक्त : जे मुद्दा उपस्थित केला त्या संबधी सदर व्यक्ती काल माझ्याकडे आले होते. १६ दिवसापासून गाडी अडवून ठेवली हे महापालिकेच्या अधिकाऱ्याना त्या व्यक्तीने

परवाच्या दिवशी सांगितले. त्या व्यक्तीची स्वत:ची गाडी असून १० वर्षापासून ट्रान्सपोर्टचे काम करतो. स्वत:च गाडी चालवितो. फार श्रीमंत व्यक्ती नाही. या संबधी उपआयुक्त(महसूल) यांचेकडे चौकशी दिली आहे. काल मुंबईला प्रशासकीय कामासाठी गेलेले आहेत, आज येतील. त्यांचे समोर त्या व्यक्तीची सुनावणी घेतली जईल. ६ तारखेपासून सदर गाडी ठेकेदाराच्या की महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे गाडी अडवून ठेवली ते शोधावे लागेल. ज्यांची चूक असेल त्यांचेकडून वसूल केले जईल. चूक कोणाची आहे पहावे लागेल.

श्री.मुजेब खान :परवाच्याच दिवशी मी संबधीत अधिकारी यांना या बाबत कल्पना दिली होती. जकात संबधीची रोजच्या रोज माहिती उपलब्ध झाली पाहिजे या पूर्वीही दोन गाडया अडवून त्यांचेकडून जस्त रक्कम घेवून गाडया सोडवून दिल्या. त्यावेळी मी स्वत: तेथे गेलो होतो महानगरपालिकेचे कुणीही अधिकारी नव्हते. जकात संबधी रोजच्या रोज रिपोर्ट महानगरपालिकेकडे यावयास पाहिजे अधिकारी हे फक्त तडजेड करण्यासाठी तेथे हजर राहतात हे खात्रीशीर सांगतो.

मा. आयुक्त : ६ तारखेपासून अधिकारी जकात विभागात नव्हते असे होणार नाही.

श्री. मुजेब खान : अधिकारी भेटले असते तर संबधीत व्यक्तीनी अधिकाऱ्याशी संपर्क केला असता. सदर व्यक्ती १५ दिवसापासून फिरते आहे कुणीही भेटण्यास तयार नाही. मला भेटल्यानंतर मी आपल्याकडे घेवून आलो. मी प्रशासनाकडे तसे पत्र ही दिले. नगरसेवकांना हा त्रास होतो तर आम नागरीकांना किती होत असेल. निवडून येवून १६ महिने झाले, कुठेही विकास काम झाल्याचे दिसून येत नाही. ६-६ महिने संचिका लेखा विभागात पडून राहतात. प्रत्येक वेळेस सदस्यांना आयुक्तांकडे जवे लागते हे बरोबर नाही. नाक्यावर जी गुंडागर्दी होत आहे त्या बाबतीत ठोस निर्णय घ्यावा किंवा महानगरपालिकेने जकात वसूली करावी. नसता दुसरे टेंडर काढून जकात वसूली ठेका देण्यात यावा.जे लोक जकात चोरी करतात त्यावर १० पट दंड आकारून जी वसूली केली जते ती आजपर्यत किती झालेली आहे.

मा. आयुक्त : यापूर्वी वसूलीचा रिपोर्ट दररोजयेत असे. कोणती गाडी अडवली व कोणत्या कारणामुळे किती दंड वसूल केला याचा रिपोर्ट येणे आवश्यक आहे.

श्री. साहेबराव कावडे : जेंव्हा खाजगीकरणाचा प्रस्ताव मंजूरीसाठी आला त्यावेळी मा.आयुक्त यांनी असे म्हटले होते की जर ठेकेदाराच्या विरूध्द काही तक्रार आली तर दोन तासाच्या आत नागरीकांना मोकळं केलं जईल. परंतू अनेक तक्रारी आलेल्या आहे अद्याप कार्यवाही केलेली नाही. मनमानी करून पैसे आकारले जतात. दादागिरीची भाषा संबधीत ठेकेदाराचे कर्मचारी करतात. १०/-रू.ची वस्तू असेल तर १००/-रू. त्याची किंमत लावतात त्यानूसार जकात आकारतात. हे योग्य नसून ताबडतोब या संबधी नियमानुसार कार्यवाही करावी.

मा. सभापती : जकात अधिक्षक यांनी या संदर्भात खुलासा करावा.

श्री.मो.जवेद मो.इसाक : जेंव्हा पासून खाजगीकरण झाले तेंव्हापासून १०पट रक्कम दंडापोटी घेतली जते आतापर्यत किती रक्कम वसूल केलेली आहे याचाही खूलासा करावा.

जकात अधिक्षक : दहा पट दंड आकारणी करून वसूल केलेल्या अशी १६८ प्रकरणे झालेली असून दंडापोटी आतापर्यत रू.८,७६,३७५/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे.

श्री. मुजीब खान :आज २२ तारीख आहे. गेल्या २२ दिवसात किती गाड्या अडवून दहापट दंडापोटी रक्कम वसूल केलेली आहे.

जकात अधिक्षक : सप्टेबर महिन्यात एकूण २० केसेस झालेल्या असून दहा पट दंडापोटी ८९,०००/- रूपये वसूल केलेले आहे.

श्री. मुजीब खान : गेल्या २० दिवसात अनेक प्रकरणे झाली. परवाच्या दिवशी एक सिमेंटची गाडी अडवून त्यांचेकडून तीन हजर रूपये त्या गाडीवाल्याकडून घेतले व दंडापोटी १० हजर घेतले त्याचा रेकॉर्ड महापालिकेकडे नाही. अधिकारी जगेवर नसतात, २५ टक्के केसेस बाबत माहिती देत आहे.

श्री.त्र्यंबक तूपे : गाडी अडवून ठेवली व मोठया रक्कमेची मागणी केली असे स. सदस्य यांचे म्हणणे आहे व हे सर्व करण्यात अधिकारी मध्यस्थी करीत असेल तर ही गंभीर बाब आहे. कोणत्या अधिकाऱ्यांनी मध्यस्थी केली खूलासा करावा.

जकात अधिक्षक : जकात चोरी प्रकरणाच्या केसेस भरारी पथकाकडून पकडल्या जतात त्या केसेस महानगरपालिकेकडे वर्ग करून घेतल्यानंतर त्यामध्ये कूणीही अधिकारी मध्यस्थी करीत नाही. जे कूणी मालक आहे त्याचेकडून विचारपूस केली जते. व नियमानूसार कार्यवाही केली जते. दररोजचा रिपोर्ट घेत नाही. परंतू आठवडयाचा रिपोर्ट घेतला जतो.

श्री. मुजीब खान : मी विरोधी पक्ष नेता होतो तेंव्हा दररोजचा रिपोर्ट येत होता.

मा. आयुक्त : खाजगीकरण होण्या अगोदर दररोजचा वसूलीचा रिपोर्ट येत असेल आताही येतो. परंतू किती गाड्या अडवल्या व दहा पट दंडापोटी किती रक्कम वसूल केली याचाही रिपोर्ट येणे आवशक आहे.

श्री. दिलीप गायकवाड : सभागृहात मतदान घेवून जकात खाजगीकरणाचा ठेका रद्द करता येईल का ते पहावे. जकात खाजगीकरण रद्द करावे असे माझे मत आहे.

मा. सभापती : जकात विभागाच्या संदर्भात स. सदस्य श्री. मुजीब खान यांनी अत्यंत गंभीर बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. महानगरपालिकेचे जे अधिकारी तेथे नेमलेले आहे ते शहरातील नागरीकांना मदत करण्यासाठी आहेत. सहकार एजन्सी व महानगरपालिका यांचे मधला दुवा असे काम अधिकाऱ्याचे आहे. जनतेचे व महापालिकेचे हित लक्षात घेवून महापालिकेचे अधिकारी यांनी नागरीकांना मदत करणे गरजेचे आहे. जी रक्कम दंडापोटी वसूल होते त्याची संपूर्ण माहिती ही रोजच्या रोज महापालिकेला देणे आवश्यक आहे आणि संबधीत व्यक्तीची गाडी १६ दिवसापासून अडवून ठेवली यात ज्यांचा कुणाचा दोष असेल त्यांचेकडून ती रक्कम वसूल करण्यात यावी. आताच स.सदस्य यांनी म्हटल्या प्रमाणे नाक्यावर कुणातरी व्यक्तीला मारहाण केली. पायावर जखम केली. या संदर्भात संसबधीत एजन्सीला प्रशासनाने नोटीस देवून कार्यवाही करावी.

श्री. पुनमचंद बमणे : सहकार एजन्सीने नाक्यावर जे कर्मचारी कार्यरत आहे. त्यांची वर्तणूकी बाबत पोलीस विभागाकडून प्रमाणपत्र घेतलेले आहे का ?

श्री. विनायक पांडे : जे कर्मचारी कामावर आहे त्यांचे वर्तणूक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. मुद्दामहून संबधीत ठेकेदारांनी गुंड प्रवृत्तीचे लोक जकात वसूलीसाठी ठेवलेले आहे.

मा. सभापती : अशा प्रवृत्तीचे कर्मचारी तेथे असतील तर त्याची चौकशी करून त्यांना तेथून काढण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. विनायक पांडे : मागिल बैठकीत मी माझ्या भागात सिटी बसेस सुरू करण्या संदर्भात सूचना मांडली होती. अधिकारी यांचेकडून खूलासा घेण्यात यावा.

उपअभियंता(यांत्रिकी) : सध्या १७ रूटवर बसेस चालू असून औरंगपूरा ते शिवाजेनगर ४, मध्यवर्ती बसस्थानक ते शिवाजेनगर २, रेल्वे स्टेशन ते सिडको बसस्थानक ३ , रेल्वे स्टेशन ते चिकलठाणा ६,रेल्वेस्टेशन ते हसूल ४,औरंगपूरा ते सिडको टीपॉईन्ट ४,रेल्वेस्टेशन ते शहागंज४,औरंगपूरा ते विद्यापीठ १,शहागंजते चिकलठाणा ४,शहागंजते गादीया विहार ४,मध्यवर्ती बसस्थान ते चिकलठाणा २,औरंगपूरा ते नंक्षत्रवाडी २,रेल्वेस्टेशन ते शिवाजेनगर २,औरंगपूरा ते हडको ४,रेल्वेस्टेशन ते हडको कॉर्नर २, औरंगपूरा ते रामनगर २ , औरंगपूरा ते कामगार चौक सिडको २ बसेस अशा एकूण १७ रूटवर ५२ बसेस चालू आहे. एकूण ५५ बसेस असून ३ बसेस स्पेअर मध्ये ठेवलेल्या आहेत.

श्री. विनायक पांडे : माझ्या वार्डात बीबीचा मकबरा, गुरू गणेशनगर परीसर डी के के एम कॉलेजमुगदीयांचे डि.एड्. कॉलेजआसाराम बापूंचे आश्रम आणि मराठवाडा विद्यापीठाचा परीसरसह घाटी रूग्णालय असे सर्व भाग येतात. पूर्वीच्या सिटबसचा मार्ग छावणी शहांगजमार्गे बेगमपूरा जयसिंगपूरा होता. या मार्गावर व डी के के एम कॉलेजपर्यंत तसेच आसाराम बापू आश्रम पर्यत बसेस सूरू कराण्यात यावी. औरंगपूरा ते विद्यापीठ पर्यत एकच बस फेऱ्या मारते. विद्यापीठात सर्व मराठवाडयातील नागरीक येत असतात. त्या नागरीकांची लुटमार व गैरवर्तणूक शिक्षावाले कडून होत आहे. त्यासाठी बसचे मार्ग वाढविण्यात यावे. नवीन बसेस केंव्हा येणार आहे.

उपअभियंता(यांत्रि.) : नवीन बसेससाठी दोन महिने लागतील, प्रपोजल मंजूर झालेले आहे.

श्री. मुजीब खान : रेल्वेस्टेशन ते सेन्ट्रल नाका पर्यत बस सूरू करावी.

मा. सभापती : नवीन बस उपलब्ध करण्याच्या संदर्भाने कार्यवाही करावी. स. सदस्य श्री. विनायक पांडे यांनी सूचना केल्या प्रमाणे त्या भागात व इतरही काही भागात बस सेवा सूरू करण्याबाबत सदस्यांनी मागणी केलेली आहे त्या भागातही अमबजवणी करावी.

श्री. रविकांत गवळी : बस कशी असावी. त्या बाबत अटी व शर्ती काय आहेत.महसूल किती प्रमाणात जमा झालेला आहे. ज्या प्रमाणे बस मॉडेल सलेक्ट केले होते त्या प्रमाणे बस आहे का या सर्व बाबीचा खूलासा पूढील बैठकीत देण्याच्या सूचना कराव्यात. दीड वर्षापासून सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभैत चर्चा होत आहे. परवाच्या बैठकीत ही चर्चा होवून नाल्याची पाहणी करण्यासाठी आपण सर्व गेलो होतो. नाल्याचा सर्वे करण्यासाठी भूमि अभिलेख विभागाकडून प्रयत्न चालू आहे परंतू विलंब होत असेल तर खाजगी एजन्सीकडून नाल्याचा सर्वेचे काम करून घ्यावे नागरीकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे.सर्वेचे काम झाल्यास झालेले अतिक्रमण काढता येईल.

श्री. मुजीब खान : सिटी सर्वे भूमि अभिलेख कार्यालयाकडे संपूर्ण शहराचे नकाशे नगर रचना विभागात नाल्यांची मूळ हद्द, रूंदी नकाशाांवर दाखविलेली आहे. १५ दिवसात सर्वेचे काम होवू शकते.जेंव्हा लेआऊट असेल इमारत बांधकाम परवानगी असेल तेंव्हा नाल्याची सिमा किती आहे याचा विचार करतो. प्रत्येक नाल्यास सर्वे केल्यास १५ दिवसापेक्षा जस्त कालावधी लागणार नाही एका नाल्याच्या सर्वेला सुरूवात झाल्यास शेवटपर्यत करावे जेणे करून या समस्या वारंवार निर्माण होणार नाही.

श्री. त्र्यबंक तुपे : एमजीएम पासून जे नाला येतो तो संजयनगर , जयभवानीनगर कैलासनगर तसेच दादाकॉलनी या भागातून येतो. खामनदी काठच्या लोकांच्याच घरात पाणी गेले अशातला भाग नाही याही भागात अनेक लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे. ८-१० फुट नाल्यात गाळ साचलेला असून ज्या सिवरेज लाईन आहे त्या पूर्णपणे फुटलेल्या आहेत. उन्हाळयात पण जेसांडपाणी वाहते ते वरून वाहते.ड्रेनेजलाईन हया नाल्यात सोडलेल्या आहे. त्यावर गाळ साचला असल्यामूळे बंद झालेल्या आहे. त्यामूळे साईडने पाणी वाहते.त्यामूळे पावसाचे पाण्यात ते पाणी मिसळते व लोकांच्या घरात जते. मा. आयुक्त यांना विनंती की त्यांनी स्वत: या भागात भेट दयावी. जेपर्यत गाळ काढला जत नाही तोपर्यत हा प्रश्न सूटणार नाही.व दरवर्षी तरतूद करून एक एक नाला दरवर्षी पूर्णत: साफ करण्याची मोहीम राबवावी.

सौ. लता दलाल : यापूर्वी शहा कन्सल्टन्सी कडून सन १९८८-८९ दरम्यान ८५ लक्ष रूपये खर्च करून सेवरेजलाईन टाकल्या, बरेच यास अनुसरून टाकलेल्या नाहीत. त्यामूळे दोन ते चार वर्षात कोलमडून गेलेल्या होत्या. कमीत कमी नाल्याची रूदी ही ११ मीटर असावयास पाहिजे त्या वेळच्या लोकसंख्येनूसार सिवरेजलाईन जवू शकत होती, परंतू तसे कूठेही दिसून येणार नाही. आजरोजे त्यावेळची लोकसंख्या कमी होती. नाल्याची रूंदी कमी झालेली आहे ७ मीटर पेक्षा कमी नाल्याची रूदी झालेली आहे. आणि त्या नाल्यानां मोठे पाणी येते व मोठया प्रमाणात गाठ साचलेला असल्याने तसेच अतिक्रमण झालेले असल्याने या समस्याना सामोरे जवे लागत आहे. सर्वच सिवरेजलाईन कोलमडल्या आहेत. त्यामूळे आजप्रत्येक नाल्यात ड्रेनेजलाईनचे पाणी वाहते. नाल्यात संपूर्ण घाण व दुर्गंदी निर्माण झाली आहे. १९८५ मा. सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिला होता की कोणताही नाला हा खाजगी असू शकत नाही. असे असतांना सूध्दा यानंतरही अनेक लोकानी नाल्याच्या कडेला मोठमोठी अतिक्रमणे केली आहे. स्वत:चे नावाचे खोटे पी. कार्ड तयार केले. अशा लोकांविरूध्द पून्हा न्यायालयात जण्याची वेळ आली तरी चालेच परंतू प्रशासन त्याची दखल घेत नाही. जर महानगरपालिकेने ठराव करून किंवा शासनाच्या परवानगीने नाल्यावर कुणास बांधकाम परवानगी दिले असेल तर त्यांनाही नियम घालून दिलेले असते. या सर्व बाबीची दक्षता घेवून कार्यवाही करावी व दरवर्षी नाला सफाईच्या नावाखाली वरवर साफसफाई करून पैसे । खर्च करतो तो वाया जतो त्यापेक्षा एकदाच सर्वच नाल्याची बजेटमध्ये ५० ते ६० कोटीची तरतूद करून खोलपर्यत घाण/गाळ काढावे.

श्री. मुजीब खान : मा. जिल्हाधिकारी यांचे अखत्यारीत नाले येतात. हे जरी सत्य असले तरी पोलीस कॉल्नी पासून ते हिनानगरपर्यत जे नाला येतो त्याचा सर्वेन. १ होता त्या नाल्याचा काही भाग पलीकडे गेला होता व काही भाग सर्वेनंबर नुसार बरोबर होता. जेथे नाला होता त्यांची सिमा व रूदी संपूर्ण दाखविण्यात आले होते. या संदर्भात प्रकरण चालू होते. पोलीस अधिक्षक सौ. मिरा बोरवणकर यांनी त्या जगेची पूर्ण मोजणी केली त्यात तीन इमारती येत होत्या त्या त्यांनी पोलीसाची मदत घेवून पजेशन मध्ये ती जगा घेतली आजही ती जगा पोलीस विभागाच्या ताब्यात आहे. संबधीत लोक न्यायालयात गेले निर्णय पोलीस विभागाकडून लागलेला होता. त्या नाल्याचे सिमांकन केले होते पून्हा त्यास स्थलांतर

करून ३० बाय ४०० फुटात भूखंड पाडले. आज ७.५० लक्षचे नाला ट्रेनिंगचे अंदाजपत्रक केले आहे. याची मा.आयुक्तांनी स्थळ पाहणी करावी. त्या बाबतीत चौकशी करून कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल : पी. आर कार्ड तयार करतांना नाल्याचा फ्लोटींग एफएसआय वापरून सूध्दा काही इमारती झालेल्या आहेत.त्याची सूध्दा नोंद घेवून त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. साहेबराव कावडे : पूर्ण रेकॉर्ड हे तहसील कार्यालयात मिळू शकेल. त्याचेकडे नकाशा असेल. नाल्याच्या आजूबाजूचे सर्वे नंबर किती होते त्याची चौकशी करावी. पोटखराबी किती येते. यात लोकांनी मोठे अतिक्रमण केलेले असून त्याची झळ महानगरपालिकेला होते आहे. सूकना नदीकाठी लोकांनी मोठे अतिक्रमण केलेले असून नारेगाव ब्रिजवाडी या भागातील नदीतून ड्रेनेज लाईन गेलेली असून या लाईनवर लोकानी अतिक्रमण केलेले आहे. भविष्यात ड्रनेज लाईनचे काम करणे शक्य होणार नाही. याची सुध्दा चौकशी करून कार्यवाही करावी.चिकलठाणा भागात दोन पूल वाहून गेले त्यासाठी तरतूद करून शाळेतील मुलांना जण्यायेण्यासाठी त्रास होत आहे ताबडतोब या पूलाचे काम करण्यात यावे.

श्री.दिलीप गायकवाड: औरंगपूरा येथे शिवाई ट्रस्टने जेकाम केले त्या इमारतीना ११ मीटरची लेन्थ आहे का परवानगी कशी दिली यांचा खूलासा करावा.

मा. सभापती : अधिकारी पाहतील.

डॉ. आशा बिनवडे : नाल्यावर झालेले अतिक्रमण हा एक विषय आहे परंतू नाल्याच्या बाजूला मोठया इमारती झाल्या असून या लोकांनी सरळ अप्रोच रोड मिळविण्यासाठी नाल्यावर अनधिकृत स्लॅब टाकून तेथे लहान पाईप टाकून नाल्याची रूंदी कमी केली व त्याखालीच ड्रेनेज लाईन चेंबर केलेले आहे त्यामूळे आणखीनच रूंदी कमी झालेली असून १७ तारखेच्या पावसाचे जवाहर पोलीस स्टेशन चौकात दोन फुट पाणी होते.या बाबती चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक: हत्तेसिंगपूरा एसटी कॉलनी भागात दरवर्षी नाल्याचे पाणी घुसते. मागिल वेळेस त्या नाल्याच्या कडेला मा. खासदार चंद्रकांत खैरे यांचे निधीतून १४ लक्षची संरक्षित भिंत बांधण्यात आलेली होती. परंतु जमीन मालक यांनी संगनमताने ती भिंत तोडून नाल लहान करण्यात आला. मी उपोषणाला बसलो होतो.

श्री. हिम्मतराव दाभाडे : महानगरपालिकेत गोंधळ आहे. खोटे पीआर कार्ड, खोटे कागदपत्रे केलेले आहे. अतिक्रमण होत आहे. ज्यानी अशी कूणाला मदत केली त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही व्होणे गरजेचे आहे. पीरबाजर भागात १०० ते २०० फुटाच्या अंतरावर व एकनाथनगर डीपी जवळ असे दोन ठिकाणी अतिक्रमण केलेले आसून तेथे पाच ते सहा टपऱ्या आहे पूर्वी त्या ठिकाणी दुधडेअरीसाठी परवानगी घेतली होती. ती बंद करून त्या ठिकाणी एसटीडी चालू केलेली आहे. या संदर्भात मी अतिक्रमण विभागास श्री.निकम यांना वारवांर सूचना केली. कार्यवाही केलेली नाही. या बाबतीत खूलासा करावा.

श्री. साहेबराव कावडे : जेथे जेथे अतिक्रमण केलेले आहे तेथे अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात यावी.

श्री. रविकांत गवळी : नाला ऐवजी नाली अ सा शब्द वापरावा. नाला व नदी यावर जेअतिक्रमण झालेले आहे ते किती झालेले आहे याची माहिती आहे का शहरात एकूण नाले किती माहिती नसेल

तर नगररचना विभागाकडून, सीटी सर्वे कार्यालय, भूमि अभिलेख विभागाकडून संपूर्ण माहिती घेण्यात यावी. नाल्याची रूंदी किती आहे याची माहिती घेण्यासाठी सर्वे करण्याची गरजआहे. सर्वे केल्यानंतर अतिक्रमण किती झाले हे लगेच दिसून येईल.

मा. सभापती : नाला साफसफाई करतांना मागिल वेळेस श्री. पानझडे यांना अशी सूचना केली होती की एक पथक तयार करावे ज्यात एक जेसीबी व दोन स्वीपर व पाच मजूर हे कायम स्वरूपी असतील. दरवर्षी लाखो रूपये खर्च होते तरी सूध्दा म्हणावी तशी साफसफाई होत नाही. या पथकाद्वारे जर नाला सफाईची मोहीम राबविली तर निश्चितच नाले साफ होतील व महानगरपालिकेचा आर्थीक खर्च ही कमी होईल.आताच खामनदी व सर्वेक्षणाचा विषय मांडला ज्या ज्या ठिकाणाहून कागदपत्र उपलब्ध होतील त्याचे निश्चित सिमांकन करून, त्याची मार्कींग करणे आवश्यक असल्यामूळे महानगरपालिकेच्या वतीने हे शक्य होत नसेल तर चांगली एजन्सी जी प्रशासनास योग्य वाटेल अशा एजन्सीला सर्वेचे काम देण्यात यावे. १५ दिवसाच्या आत या नाल्याचे सर्वेक्षण होईल या दृष्टीने काम करावे व जेअतिक्रमण असतील ते काढावे. प्रत्येक वेळी सदस्यांनीच सांगावे असे नाही.

श्री. दिलीप गायकवाड : माझ्या वार्डात ड्रेनेजलाईन पूर्णपणे फूटलेली असून त्याचे घाण पाणी पूर्ण सलीम अली सरोवर मध्ये जेते. दीड महिना झाला आपण पाहणी केली होती अदयाप कार्यवाही केलेली नाही.त्यामूळे तेथील गुत्तेदार यांचे लाखो रूपयाचे नुकसान झालेले आहे लाखो मासे मृत्यूमूखी पडले आहे. त्या ठेकेदाराना नुकसान भरपाई देणार की पुन्हा मुदतवाढ देणार आहे याचाही खूलासा करावा.

श्री.त्र्यबंक तूपे : ड्रेनेजचे पाणी सरोवरात जते का याचा खूलासा घेण्यात यावा.

कार्य. अभियंता(ड्रेनेज): ड्रेनेजचे पाणी पावसाळयामध्ये ओव्हर फ्लो झाल्यानंतर सरोवरात पाणी जते १५ दिवस सतत तेथे काम केले व ड्रेनेजचे चोकअप काढून आता सध्यातरी पाणी सरोवरात जत नाही.

मा. सभापती :कार्य. अभियंता ड्रेनेजयांनी स्वत: तेथे पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. मुजेब खान : एक अधिकाऱ्याकडे चार पाच विभागाचे चार्जदिलेले आहे. श्री पानझडे यांचेकडे लाईट ड्रेनेजनाल्याची मोठी समस्या निर्माण होत आहे हे सर्व काम एक अधिकारी करू शकतात काय?

शहर अभियंता : महानगरपालिकेत तीन कार्यकारी अभियंता असून एका कार्यकारी अभियंत्याकडे बरेचशे विभाग असू शकतात. त्या प्रमाणे त्या विभागची विभागणी केलेली आहे. त्याचे खालचे विभागात उपअभियंता दिलेले आहेत त्याचे हाताखाली क. अभियंता काम करतात. एका कार्यकारी अभियंत्याकडे चार ते पाच उपविभाग असतात.

श्री.मुजेब खान : विभाग प्रमुख भेटतात खालचे अधिकारी कार्यालयात कधीच भेटत नाही. इतर ही काही अधिकारी आहे त्यांचेकडे काही विभागाचा चार्जदेण्यात यावा जेणे करून तातडीने विकास कामे होतील.

मा. सभापती : या संदर्भात मा.आयुक्तांना अशा सूचना करण्यात येते की जर काम विभागून देणे आवशक वाटत असेल तर तशी कार्यवाही करावी.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : प्रशासनाचे अभिनंदन करतो की त्यांनी सिल्लेखाना येथील जनावराची होत असलेली अनधिकृत कत्तल बंद केली व भाग स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. परंतू हे सर्व लोक स्लॉटर हाऊसवर जत आहे. तेथे इतकी घाण आहे की सदर बीफ शहरात विक्रीसाठी येते व ते नागरीकानी खाल्लेनंतर त्याचे आरोग्य धोक्यात येवू शकते. एक तर तेथे पाण्याची सोय नाही. पाण्याची टाकी बांधलेली आहे त्यात पशुपक्षी मृत झालेले आहे. त्या टाकीत पाणीच नाही. त्या ठिकाणी कमीत कमी ८ ते १० टँकर पाणी लागते. जनावराची कत्तल होते ते मांस शहरातील नागरीकाना सायकांळ पर्यत विक्री केले जते ते पूर्णपणे खराब होते. स्लाटर हाऊस कडे ये ज करण्यासाठी रस्ता व्यवस्थीत नाही. जे चमडा काढला जतो त्यासाठी १५०० स्वे.फुट गोडावून अपेक्षीत आहे तेथे कमीत कमी १५० ते २२५ दररोज जनावराची कत्तल होते परंतू ४५० स्क्वे. फुटचे कमी दिले. ते अपूरे पडते.त्यामुळे दुर्गधी निर्माण होते व ती पसरते. स्लॉटर हाऊस हे हायटेक प्रकारचे असावे. अलाना एक मोठी फॅक्टरी आहे त्याचे स्लॉटर हाऊस बघावयास पाहिजे तसेच मुंबईला देवनार मध्ये स्लॉटर हाऊस आहे ते बघून त्या प्रमाणे येथे स्लाटर हाऊस करावयास पाहिजे तेथे जे स्लॉटर हाऊस चे शेड आहे ते कमी पडते मोठे करण्यात यावे.तसेच जेथे कत्तल केली जते त्या ठिकाणी हौदात पूरेसे पाणी नाही. त्यामूळे तेथील कर्मचारी यांनात्रास सहन करावा लागतो. व शहरातील जी जी घाण होत होती ती बंद केली प्रशासनाचे पून्हा अभिनंदन करतो. आताच म्हटल्याप्रमाणे तेथे सर्व सुविधा देण्यात याव्या व सर्व सदस्यांनी एक वेळेत तेथे भेट दयावी जेणे करून तेथील परीस्थित समजेल.

श्री. त्र्यबंक तूपे : स्लॉटर हाऊस वर सर्व सुविधा महानगरपालिकेच्या वतीने देण्यात याव्यात. जे मांस शहरात विक्रीसाठी येते ते विक्री करतात त्याचेकडे परवाने आहेत का आरोग्य ते मांस धोकादायक असेल तर यास जबाबदार कोण ? असा प्रश्न निर्माण होतो. जर परवाने असतील व जस्त वेळ पर्यत ते विक्री करीत असतील तर कार्यवाही करता येईल. या विक्रेत्याकडे लायसन्स असावयास पाहिजे.

श्री. मुजीब खान : प्रत्येक वार्डात किती असे दुकाने आहे याचा सर्वे करून सभागृहाला माहिती देणार होते . तसेच शहरत ठिकठिकाणी याचे मार्केट आहे त्या ऐवजी चार ते पाच वार्ड मिळून एकाच ठिकाणी मार्केट झाले तर योग्य होईल. परंतू हे नियोजन करण्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे.यासाठी स्थायी समिती सर्वसाधारण सभेचे मान्यताही दिलेली आहे त्या योजनेचे काय झाले याचाही खूलासा करावा.

श्री.मो.जवेद मा.इसहाक : परवाने देतांना काही अटी शिथिल कराव्यात जे संबधीत लोक कागदपत्र आणू शकणार नाही त्याची मागणी केली जते. ती अट शिथील करावी अशी विनंती आहे.

श्री. दिलीप गायकवाड : टी. व्ही सेंन्टर या भागात दररोजकिती जनावरे कापले जतात. याचाही खूलासा करावा.

संचालक (प्रा.सं.) : पडेगाव स्लॉटर हॉऊस संदर्भात केंद्रशासनाकडे महानगरपालिकेने २००१-०२ मध्ये प्रोजेक्ट सादर केला होता. केद्र शासनाने कत्तलखाना अधुनिकीकरणासाठी २.२४ कोटी मंजूर केले. त्यावेळी शासनाने टोकन रक्कम १० लक्ष दिली होती. महानगरपालिकेने आतापर्यत ७० ते ८० लक्ष रूपये स्लॉटर हाऊससाठी खर्च केलेले असून तेथे एक पाण्याची टाकी असून संप ही केलेले आहे. विदयापीठ टाकीतून तेथे पाणी येते दररोज५० हजर लीटर पाणी येते.

सौ. लता दलाल : जे रक्कम मिळणार आहे किती वर्षात मिळणार आहे.त्यासाठी केंद्र शासनाचे काही नियम आहेत काय व महापालिका प्रशासन त्यासाठी कमी पडले आहे का याचा खूलासा करावा.

संचालक (प्रा.सं.) : शासनाने सन २००४-२००५ मध्ये ही स्कीम बंद केली. तरी सूध्दा मंजूरी दिलेले अनुदान देण्यात यावे म्हणून मागणी केलेली आहे.

सौ. लता दलाल : केद्र शासनाकडून अनूदान येणार म्हणून महानगरपालिकेने तेथे ७० ते ८० लक्ष खर्च केले का?

संचालक (प्रा.सं.) : जे निधी येणार होता तो कोणत्या कामावर किती खर्च करावयाचा याचा तपशील दिलेला होता. जे खर्च झाला त्याचे किमान ५० टक्के तरी रक्कम दयावी म्हणून मागणी केलेली आहे.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहे. मी सकाळी स्लॉटर हाऊसला भेट दिली. तेथे एक ते दोन टँकर पाणी येते. तसेच पिण्याचा पाण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

संचालक (प्रा.सं.) : चमड्याचे गोदामसाठी टँकरची व्यवस्था केलेली आहे. तेथे नवीन पाईप लाईन टाकण्याचे प्रपोजल आहे. आठ ते दहा दिवसात काम होईल. चमड्याचे गोदाम साठी स्वतंत्र टँकरची व्यवस्था केलेली आहे.

श्री.मो.जवेद मो.इसाक :जेटँकर आले ते स्लॉटर हाऊससाठी आले होते चमडयाचे गोदामसाठी नव्हे. मी स्वत: तेथे उपस्थित होते. अधिकारी चूकीची माहिती देत आहे. जर ५० हजर लिटर पाणी पाईप लाईन द्वारे येत असेल तर टँकर आनण्याची गरजकाय ?पाण्याच्या पाईप द्वारे पाणीच येत नाही. पाण्याची टाकी लाखो रूपये खर्च करून बाधलेली आहे. परंतू पाणी पूरवठा होत नाही.

शहर अभियंता : या ठिकाणी शहर अभियंता श्री. सोनी डॉ. रझवी तसेच स. सदस्य श्री. मो. जवेद मो. इसहाक यांनी एकत्रित पाहणी करावी जेजेतेथे आवश्यक आहे त्या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही करावी. लायसन्सचया बाबतीत डॉ. रझवी यांनी खूलासा करावा.

संचालक (प्रा.सं.) : शहरात बिफचे २२७, मटनचे १११, तर चिकनचे २८ मासांचे ९ असे एकूण ३७५ लायसन्स आहे.

सौ. लता दलाल : शहरात मांस विक्रेतेच्या दुकाने किती आहे. जेवढे लायसन्स तेवढेच दुकाने असतील असे नाही.

संचालक (प्रा.सं.) : ज्यांच्याकडे लायसन्स आहेत अशा दुकानांचाच खुलासा केलेला आहे.जे अनधिकृत विक्री करीत असेल तसे आढळून आल्यास त्यांचे विरूध्द कार्यवाही करून पोलीस विभागाकडे ते प्रकरण दिले जते.

श्री. त्र्यबंक तूपे : चूकीची माहिती देत आहे. ११ चिकन शॉपचे लायसेन्स आहे असे अधिकारी सांगतात. बारूदगर नाल्या जवळच ११जस्त चिकनचे शॉपस् असतील.जे जे मांस विक्री करीत असेल त्यांना लायसेन्स दिले तर महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

मा. सभापती : शहरात जे काही दूकाने आहेत त्यांचा डॉ. रझवी यांनी स्वत: सर्वे करावा ज्यांचेकडे लायसेन्स नाही त्यांना देण्यात यावे घेत नसतील तर ते दुकाने बंद करावे.

श्री. मुजीब खान : स्लॉटर हाऊस व्यतिरिक्त ग्रामीण भागातून काही लोक मांस घेवून विक्री सुरू केलेली आहे. त्याचा सर्वे करावा. तसेच तीन चार वार्ड मिळून एक मार्केट करण्या संदर्भात प्रपोजल होते त्या संदर्भात खूलासा केलेला नाही.

श्री. हिम्मतराव दाभाडे : शेख शामद पिता शेख अहेमद यांनी चार वेळेस हैद्राबादहून मच्छीचे बीजआणून सलीम अली सरोवर येथे टाकले होते. त्यावेळी या सरोवरात ड्रेनेजलाईनचे पाणी वाहून येत होते. आजही तलावात पाणी ड्रेनेजचे पाणी वाहन आहे.त्यामूळे तेथील मासे मृत्यूमूखी पडून त्या व्यक्तीचे ७ लक्षचे नुकसान होवून त्यांचे कुटूंबाला उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामूळे संबधीत व्यक्तीला पूढील तीन वर्षाची कालावधी वाढवून दयावा.

श्री. दिलीप गायकवाड : जेमासे या तलावातील मरण पावले त्याची वैद्यकीय चाचणी केलेली आहे का ?

मा. सभापती :मा. आयुक्त यांनी या संदर्भात सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करून या संबधी चौकशी करून अहवाल सादर करावा.

सौ. लता दलाल : गारखेडा भागात महानगरपालिकेच्या मालकीचा एक हॉल आहे. सेवाभावी संस्थेने त्या हॉलची मागणी केलेली असून २ लक्षा रूपये अनामत भरावी, असे सांगण्यात आले. सेवाभावी संस्था एवढा खर्च करू शकणार नाही. नाममात्र शुल्क आकारून तो हॉल सेवाभावी संस्थेस देण्यात यावा. तसेच शहरात किती हॉटेल आहेत व प्रत्येक हॉटेल मालकाकडे अग्निशमन विभागाची एन.ओ. सी आहे का? तसेच जे जे विकास कामे रस्त्याची केली जते त्या संदर्भात हिस्ट्री रजिस्टरची व एजन्सीचा रिपोर्टच्या प्रतीची मागणी सदस्यांनी केली होती. ते दिले नाही. तसेच जन्म दिनाका संदर्भात अस्थापना विभागाकडे माहिती मागवली होती ती देण्यात आलेली नाही. ती सविस्तर माहिती दयावी. याची नोंद घ्यावी व हॉटेलच्या संदर्भात आदेश द्यावे.

मा. सभापती : स.सदस्या सौ.दलाल यांनी गारखेडा येथील हॉलच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. तो विचार करण्यासारखा आहे. मा.आयुक्तांना अशी सूचना करण्यात येते की, कुठलीही सेवाभावी संस्था लाखा-दोन लाख रूपये अनामत रक्कम भरू शकणार नाही. कारण त्या संस्थेला तेथे कमर्शियल ॲक्टीव्हीटीजकरायच्या नसतात. त्या भागातील नागरीकांसाठी जेसंस्कार वर्गासारखे कार्यक्रम असतात ते राबविण्यात येतात. त्यामुळे अनामत रक्कम न घेता देखभाल दुरूस्तीचा खर्च त्या संस्थेकडे सोपवून नाममात्र शुल्क आकारून ते सभागृह संबंधीत सेवाभावी संस्थेला उपलब्ध करून द्यावे. तसेच इतर मुद्या संबधीची माहिती संबधीत अधिकारी यांनी पुढील बैठकीत द्यावी.

श्री. हिम्मतराव दाभाडे : दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना तीन महिण्यापासून पगार मिळत नाही. त्या संबधीत मा. आयुक्त यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री. मिलींद दाभाडे : २ ऑक्टो. रोजे हा ५० वा धम्मचक्र परीवर्तन दिन असल्यामूळे आणि बुध्द लेणी हा महानगरपालिका हद्यीतील एक ऐतिहासीक भाग असल्याने त्या ठिकाणी दोन तीन लाख नागरीक एकत्र येतात. त्या भागात हायमस्ट लाईट लावण्याची व्यवस्था करावी.

मा. सभापती : आताच सुचना केल्या प्रमाणे सदर ठिकाणी कायम स्वरूपी विद्युत दिवे लावण्याची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : यशोधरा कॉलनी भागात महापालिकेची शाळा असून तेथे खिचडी वाटप केली जते. त्या खिचडी मधे अळया निघाल्या होत्या त्या संबधी त्वरीत चौकशी करून व संबधीत ठेका ज्यांनी घेतला त्यांचा ठेका रद्द करावा.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांनी या संबधी स्वत: पाहणी करून माझ्याकडे अहवाल सादर करावा. विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

**विषय क्र.106 :**

दिनांक **28/8/2006** (का.प.क्र.10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक 28/8/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.107 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.7 भावसिंगपुरा येथे डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.15,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात स्लम भागात पुन:डांबरीकरण करणे या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.15,00,000/-चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.7 भावसिंगपुरा येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये 15,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.108 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री इत्यादींचा जहीर लिलाव दि.५.८.२००६ रोजे, यांत्रिकी कार्यशाळा महानगरपालिका औरंगाबाद येथे बोली पध्दतीने करण्यात आला. जहीर लिलाव करण्याबाबतची नोटीस दै. लोकमत, सामना, सकाळ, औरंगाबाद टाईम्स् या वर्तमान पत्रात देण्यात आली. जहीर लिलावासंबंधी निर्णय घेणेसाठी खालील अधिकारी व स. स्थायी समितीच्या तीन सदस्यांची लिलाव कमिटी स्थापन करण्यात आली.

१) शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद.

२) अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद.

३) उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका औरंगाबाद.

४) मुख्यलेखापरिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.

५) मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.

६) उप अभियंता (यांत्रिकी), महानगरपालिका औरंगाबाद.

७) मेकॅनिकल इंजिनियर एस.टी. कार्यशाळा, औरंगाबाद
८) आर.टी.ओ. निरिक्षक, औरंगाबाद.
९) डॉ. आशा उत्तमराव बिनवडे, सदस्य स्थायी समिती.
१०)श्री. कावडे साहेबराव राणुबा, सदस्य स्थायी समिती.
११) श्री. मोहम्मद जवेद मो. इसाक, सदस्य स्थायी समिती.

अपरिहार्य कारणामुळे अ.क्र.३,४,७,८ हे सदस्य लिलावासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. बाकी सर्व सदस्य या प्रक्रियेत स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधीसह उपस्थित होते. एकूण १४६ बोलीदारांनी रू.१०,००० /- अनामत रकमेचा भरणा करून लिलावात भाग घेतला. यापूर्वीचे ऑक्शन कमिटीने दि. ९.१२.२००५ रोजे ठरविलेल्या किमतीचा लिफ़ाफ़ा सर्व कमिटी मेंबर्ससमोर उघडण्यात आला. जुने टायर्स, भंगार पार्टस्, रिकामे ऑईल ड्रम, जळालेले ऑईल ड्रममध्ये वाढ झाल्यामुळे त्याची किंमत ठरविण्यात आली. महानगरपालिकेने प्रत्येक ॲटमसाठी खालीलप्रमाणे किंमत काढली.

| अ.क्र. | विवरण | मॉडेल वर्ष | ठरविलेली किंमत |
|---|---|---|---|
| १ | एम.टी.बी. /४३४८ ट्रॉली | १९८१ | १५,००० /- |
| २ | एम.डब्ल्यु.बी./ ४०६ ट्रॉली | १९८१ | १८,०००/- |
| ३ | एम.एक्स व्ही/५२६७ महेंद्रा ट्रॅक्टर | १९८२ | ४०,००० /- |
| ४ | एम.डब्ल्यु. पी./ ७४१ ट्रॅक्टर ट्रॉली | १९८३ | २०,००० /- |
| ५ | एम.डब्ल्यु.पी./ १४७८ पी. ६ ट्रक | १९८३ | ३०,००० /- |
| ६ | एम.डब्ल्यु. पी./ १७५९ टँकर ट्रॉली | १९८४ | १७,०००/- |
| ७ | एम.ए.ए. /३०८ महेंद्रा जेप | १९८५ | २०,०००/- |
| ८ | एम.एक्स .व्ही. /५७८४ महिंद्रा ट्रॅक्टर | १९८६ | २०,००० /- |
| ९ | एम.एक्स .व्ही. /५४८८महिंद्रा ट्रॅक्टर | १९८६ | ३०,००० /- |
| १० | एम.व्ही.जे./८२११ महिंद्रा जेप | १९८८ | २०,००० /- |
| ११ | एम.एफ़.यु./९९३० महिंद्रा जेप | १९८८ | ३५,०००/- |
| १२ | एम.व्ही.जे /९३५३ महिंद्रा जेप | १९८९ | ५०,०००/- |
| १३ | एम.एच.२० ए/२१३८ टाटा १२१० हाय.लॅडर | १९८३ | लिलावातून वगळले |
| १४ | एम.एच. २० ई/८०७८ महिंद्रा जेप | १९९२ | लिलावातून वगळले |
| १५ | एम.एच.२० ई/९१५८ महिंद्रा जेप | १९९४ | ५०,००० /- |
| १६ | एम.एच.२० ई/३१०० अँम्बेसिडर कार | १९९५ | ७,०००/- |
| १७ | एम.एच.२० ई/३२०० अँम्बेसिडर कार | १९९५ | ७,००० /- |
| १८ | एम.एच.२० ई/ ९१११ अँम्बेसिडर कार | १९९५ | ७,००० /- |
| १९ | जुने निरूपयोगी टायर्स ७९८ नग | | ४१,९३०/- |
| २० | जुने भंगार सामान १३.९९ टन , रू. ८००० /- प्रतिटन | | १,११,९२० /- |
| २१ | ऑईलचे रिकामे बॅरल २०० नग ,२२५ /- प्रतिनग | | ४५,०००/- |
| २२ | जुने जळालेले ऑईल ५९ नग रू.१५०० /- प्रति बॅरल | | ८८,५०० /- |

वरीलपैकी ॲटम क्र. १३ व १४ चा फ़ेरवापर करणे असल्यामुळे त्यास लिलावातून वगळण्यात आले. ॲटम क्र. ३,१०,१२ ची किंमत मनपाने काढलेल्या किमतीपेक्षा कमी आल्यामुळे या ॲटमचा लिलाव नामंजूर करण्यात आला. इतर एकूण १७ ॲटमचा लिलाव बोली पध्दतीने करण्यात आला. त्यामध्ये खालीलप्रमाणे किमती आल्या.

| ॲटम क्र. | विवरण | जस्तीची बोली बोलणाऱ्याचे नांव | मनपाने काढलेली किंमत | बोलीमध्ये आलेली किंमत | वॅट टॅक्स | एकूण भरून घ्यावयाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.टी.बी. /४३४८ ट्रॉली | श्री. प्रकाश जैस्वाल औ.बाद | १५,०००/- | ३२,००० | ४००० | ३६,००० |
| २ | एम.डब्ल्यु.बी./ ४०६ टु व्हीलर | श्री. सलिम खाँन अमीर खाँन, परभणी | १८,०००/- | २०,७०० | २५८७ | २३,२८७ |
| ३ | एम.डब्ल्यु. पी./ ७४१ ट्रॅक्टर ट्रॉली | श्री. अब्दुल खुद्दुस गुलाम मुस्तफ़ा औ.बाद | २०,०००/- | ४३,२०० | ५४०० | ४८,६०० |
| ४ | एम.डब्ल्यु.पी./ १४७८ पी. ६ ट्रक | श्री. युनुसभाई चाँदभाई कोटलारोड अहमदनगर | ३०,०००/- | ९१,००० | ११३७५ | १,०२,३१५ |
| ५ | एम.डब्ल्यु. पी./ १७५९ टँकर ट्रॉली | समर्थ ट्रेडर्स जळगांव | १७,०००/- | ५०,००० | ६२५० | ५६,२५० |
| ६ | एम.ए.ए. /३०८ महेंद्रा जीप | शे. ज्हीर शेख निजम जफ़रगेट औरंगाबाद. | २०,०००/- | २०,००० | २५०० | २२,५०० |
| ७ | एम.एक्स .व्ही. /५७८४ महिंद्रा ट्रॅक्टर | श्री. इकबाल खाँन शफ़ी खाँन औरंगाबाद. | २०,००० /- | ३०,२०० | ३७७५ | ३३,९७५ |
| ८ | एम.एक्स .व्ही. /५४८८महिंद्रा ट्रॅक्टर | श्री. स. खलील स. वजीम औ.बाद | ३०,००० /- | ३४,६०० | ४३२५ | ३८,९२५ |
| ९ | एम.एफ़.यु./९९३० महिंद्रा जीप | श्री. कुमार अभिमन्यु मोरे औ.बाद. | ३५,०००/- | ३६,२०० | ४५२५ | ४०,७२५ |
| १० | एम.एच.२० ई /९१५८ महिंद्रा जीप | श्री. सय्यद अली सय्यद अजीज . सातोना ता. परतूर | ५०,००० /- | ५१,००० | ६३७५ | ५७,३७५ |
| ११ | एम.एच.२० ई | श्री. प्रकाश | ७,०००/- | १६,००० | २००० | १८,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | /३१०० अँम्बेसिडर कार | जैस्वाल औ.बाद | | | | |
| १२ | एम.एच.२० ई /३२०० अँम्बेसिडर कार | श्री. शेख शफ़ी शेख अजेज औ.बाद | ७,०००/- | १६,५०० | २०६२ | १८,५६२ |
| १३ | एम.एच.२० ई / ९१११ अँम्बेसिडर कार | शकील खाँन अय्युब खाँन औ.बाद | ७,०००/- | २८,००० | ३५०० | ३१,५०० |
| १४ | जुने निरूपयोगी टायर्स ७९८ | नासेरखाँन मुनीरखाँन औ.बाद | ४१,९३०/- | ७१,००० | ८८७५ | ७९८९५ |
| १५ | जुने भंगार सामान १३.९९ टन | मज्जीत मसूरी श्रीरामपूर जि अहमदनगर | १,११,९२० | २६७२०९ | १०६८८ | २७७८९७ |
| १६ | ऑईलचे रिकामे बॅरल २०० नग | शे. अकील रोहबीब औ.बाद | ४५,०००/- | ६१२०० | ७६५० | ६८८५० |
| १७ | जुने जळालेले ऑईल ५९ नग | इंडोमॅक्स केमीकल इंडस्ट्रीज जयपूर | ८८५०० | १,१८,००० | १४७५० | १,३२,७५० |

**वरील एकूण १७ अॅटमसाठी खालीलप्रमाणे किंमत येत आहे.**

१) मनपाने ठरविलेली किंमत रक्कम रू. ५,६३,३५०/-

२) जहीर लिलावात आलेली किंमत रक्कम रू. ९,८३,८०९/-

३) त्यावर वसुल करावयाचा वॅट टॅक्स रू. १,००,६३७/-

४) वॅट टॅक्ससह भरून घ्यावयाची रक्कम रू. १०,८७,४४६/-

महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या किमतीपेक्षा किंमत जस्त असल्यामुळे सर्व १७ अॅटमकरीता आलेली किंमत वॅट टॅक्स भरून घेवून त्या सर्व अॅटमचा जहीर लिलाव अंतिम करण्यास मंजूरी मिळावी. मा. आयुक्त, मनपा यांनी शिफ़ारस केली आहे. लिलाव समितीस अनेक बोलीदारांनी आम्ही पूर्ण रक्कम भरण्यास तयार आहोत, ताबडतोब डिलीव्हरी द्यावी अशी विनंती केली. त्यावर विचार करून वाहन व यंत्रसामुग्री ज्याचे नांवावर सुटली व त्यांनी पूर्ण रक्कम भरून डिलीव्हरी घेण्याची तयारी दर्शविली तर, त्यांचेकडूनही लेखी अर्ज घेवून व पैसे भरून घेऊन डिलीव्हरी द्यावी असे ठरले. लिलाव समितीचे सदस्य तथा मा. स्थायी समिती सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

तरी वरीलप्रमाणे एकूण १७ अॅटमसाठी मनपाने ठरविलेल्या किमतीपेक्षा जहीर लिलावांत जस्त किंमत आल्यामुळे व जहीर लिलाव कमिटीमध्ये स्थायी समितीचे ३ सन्माननीय सदस्य व इतर अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानूसार प्रस्तावास मान्यता देणे योग्य.

**<u>संवाद :</u>**

श्री.मो.जवेद मो.इसाक : हा प्रस्ताव स्थगित करण्यात यावा.

मा. सभापती : या प्रस्तावाचे संदर्भाने आवश्यक माहिती देण्यासाठी संबंधीत अधिकारी आज उपस्थित नाहीत. करीता हा प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.109 :</u>**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेच्या सिडको, एन-5 पंपगृह येथील 60 व 120 अ.श.क्षमतेचे एकूण चार पंप सन 1984 मध्ये बसविण्यात आलेले आहेत. पंप बसविण्यात येउन 21 वर्षे कालावधी पूर्ण झालेला आहे. पंपाचे आयुष्यमान साधारण 15 वर्षाचे असते. सदरील पंप जुने झाल्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी झालेली आहे. ज्यामुळे विद्युत देयकापोटी व देखभाल व दुरूस्तीवर जास्तीचा खर्च होत आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन येथील पंप बदलण्याच्या कामाकरीता पंपाचे उत्पादक/अधिकृत विक्रेता यांच्याकडून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सात निविदापत्रके विक्री झाली व दर भरलेलीसहा निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद - अं.प.दरापेक्षा 38.07% कमी दराने
2. मे.रेणुका इलेक्ट्रीक कंपनी, औरंगाबाद - अं.प.दरापेक्षा 33.00% कमी दराने
3. मे.पी.एच.एस.इंजिनिअर्स, मुंबई - अं.प.दरापेक्षा 30.00% कमी दराने
4. मे.बडगुजर अँड कंपनी, नाशिक - अं.प.दरापेक्षा 26.69% कमी दराने
5. मे.रूसो ॲग्रो प्रॉजेक्ट प्रा.लि. पुणे - अं.प.दरापेक्षा 25.00% कमी दराने
6. मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद - अं.प.दरापेक्षा 18.00% कमी दराने

वरीलप्रमाणे प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असून अंदाजपत्रक रक्कम रू.20,19,635/- रक्कमेच्या दरापेक्षा 38.07% कमी दराने आहे. मा.आयुक्तांनी या प्राप्त दरास मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी सदर कामासाठी मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेच्या सिडको, एन-5 पंपगृह येथील 60 व 120 अ.श.क्षमतेचे जुने चार पंप बदलण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38.07% कमी दराची मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.110 :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या ब्लिचींग पावडरच्या पुरवठ्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.16,50,000/-चे महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या दरसूची 2005-2006 नुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीच्या दि.24-8-2005 रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये स्वीकृती प्रदान केली आहे.

मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार महानगरपालिका निविदा सूचना क्र.30/2005 दि.1.9.2005 अन्वये निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजित तारखेस पाच निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. मे.शिव केमिकल्स, शेवगांव | रू.13880/- प्रति टन |
| 2. मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा | रू.13700/- प्रति टन |
| 3. मे.गजानन केमिकल्स, परभणी | रू.13199/- प्रति टन |
| 4. मे.फोनीक्स केमिकल्स, औरंगाबाद | रू.14384/- प्रति टन |
| 5. मे.जयभारत एंटरप्रायझेस, नगर | निविदा उघडण्यात आली नाही. |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदेमधील सर्वात कमी दराची निविदा ही मे.गजानन केमिकल्स, परभणी यांची असून दर रू.13199/- प्रति टन असा आहे. या दरानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू.16,50,000/- पेक्षा 19.99% जास्तीचा असल्यामुळे मा.आयुक्तांनी दराच्या वाटाघाटीकरीता पाचारण करणे बाबत सूचित केले. त्यानुसार निविदा धारकांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.

निविदाधारक मे.गजानन केमिकल्स, परभणी यांनी प्रथमतः दर कमी करणे शक्य नसल्याबाबत लेखी सादर केले. यानंतर रू.199/- प्रति टन दराने कमी करून रू.13000/- प्रति टन दराने पुरवठा करणेबाबत पत्र देऊन संमती दर्शविली होती.

चालू निविदेचा दर रू.11880/- प्रति मे.टन असा असल्याने मे.गजानन केमिकल्स, परभणी यांना पुन्हा वाटाघाटी करणेसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे बाबत सुचविण्यात आले होते. तथापी मे.गजानन केमिकल्स, परभणी यांनी रू.13000/- प्रति मे.टन या दरातही पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली. या कारणामुळे निविदेतील दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे निविदाधारक मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांना कमीत कमी दराबाबत पुनःश्च विचारणा करण्यात आली. मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज यांनी रू.13500/- प्रति टन या कमीत कमी दरात पुरवठा करणेबाबत संमती दर्शविली. या दरात खरेदी करणे ऐवजी फेरनिविदा करणे बाबत मा.आयुक्तांनी आदेशीत केले.

मा.आयुक्त, यांचे आदेशानुसार मनपा निविदा सूचना क्र.08/2006 दि.12.5.2006 अन्वये वार्षिक ब्लिचींग पावडर पुरवठ्याकरीता फेरनिविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकापर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या दिनांकास दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा | रू.14000/- प्रति मे.टन |
| 2. मे.बालाजी केमिकल्स, नगर | रू.25/- प्रती किलो म्हणजेच रू.25000/-प्रती मे.टन |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराची निविदा मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज यांची असुन दर रू.14,000/- प्रति मे.टन असा आहे. सदरचा दर कमी करणे बाबत विचारणा केली असता दर कमी करण्यास असमर्थता दर्शविण्यात आली होती. मा.आयुक्तांनी इतर विभागाकडील रेट कॉन्ट्रॅक्ट (R.C.) बाबत विचारणा करण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे विचारणा केली असता दोन्ही विभागाकडे आर.सी. उपलब्ध नसल्याचे समजले. तथापी या वर्षीच्या पुरवठ्याचे दर हे अनुक्रमे रू.18840/- प्रति मे.टन व रू.14000/- प्रति मे.टन असल्याबाबत कळविले आहे.

पुरवठा धारका समवेत चर्चा केल्यानंतर मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज यांनी रू.13900/- प्रती मे.टन या दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविली होती व त्यानुसार जा.क्र.मनपा/काअ/पापु/512/2006 दि.16.6.2006 अन्वये मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापी स्पर्धात्मक दर

प्राप्त झालेले नसल्याने फेरनिविदा काढण्याबाबत मा.सभापती, स्थायी समिती यांनी बैठकीपुर्व झालेल्या चर्चेत निर्देश दिले होते.

आदेशानुसार कार्यालयीन निविदा सूचना क्र.23/2006 दि.29/7/2006 अन्वये वार्षिक ब्लिचींग पावडर पुरवठ्या करीता फेरनिविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकापर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या दिनांकास दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा रू.13700/- प्रति मे.टन
2. मे.विमल ट्रेडींग कंपनी रू.13900/- प्रति मे.टन

वरील प्रमाणे प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराची निविदा मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज, कोटा यांची असुन दर रू.13700/- प्रति मे.टन असा आहे. उपरोक्त दरास मा.आयुक्तांनी मा.स्थायी समिती सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यासाठी दि.25/8/2006 अन्वये शिफरस केली आहे.

ओरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे वार्षिक ब्लिचींग पावडरचा पुरवठा मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांचेकडून रू.13700/- प्रति मे.टन या दराने खरेदी करण्यासाठीची निविदा मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

डॉ. आशा बिनवडे : हा प्रस्ताव वाचल्यानंतर असे लक्षात येते की सुरूवातीला टेंडर कॉल केले होते. दोन क्रमाकांचे मे.क्लोरोकेम ईडस्ट्रीजकोटा यांना वाटाघाटी साठी बोलवले होते. या कंपनीने १३,५००/- रू.प्रति टन या कमीत कमी दरात पुरवठा करण्यासंदर्भात एकदा सम्मती दर्शविलेली होती. त्याही वेळेस दोनच निविदा आल्याने फेर निविदा काढण्याचे ठरवले होते. पुन्हा दोन टेंडर भरून आले व सर्वात कमी दराचे म्हणून पून्हा क्लारोकेम इंडस्ट्रीज कोटा यांची निविदा स्विकारण्याची शिफारस केली. आता १३,७००/- म्हणजे२०० /- रूपये जस्त देवून पूरवठा करून घेणार आहात काय? यावर विचार करावा. त्यांना वाटाघाटीसाठी बोलवावे व तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा. सभापती : संबधीत एजन्सीला मा.आयुक्त यांनी बोलवून वाटाघाटी कराव्यात व १३५००/-रू. या दराने पुरवठा करण्यास तयार असेल तर काम देण्यात यावे नसता फेर निविदा काढण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चचेनुसार औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या ब्लिचींग पावडरच्या पुरवठ्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांचेकडून रू.13500/-प्रति मे.टन या दराने ब्लिचींग पावडर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संबंधीत एजन्सी वरील दराने पुरवठा करण्यास तयार असेल तर त्यांना देण्यात यावे, अन्यथा फेरनिविदा काढण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.111 :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे (**भाग 1**), सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लॅण्ड स्केपिंग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करणेकरीता सा.बां.विभागाच्या सन **2004-05** च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.50,00,000/- चे प्रथम टप्प्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, त्यास

मा.आयुक्तांनी सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव शिफारस केलेली होती. मा.सर्वसाधारण सभेने दि.24.5.2006 रोजी ठराव क्र.260/2 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार टप्पा क्र.1 **भाग-1** मधील विविध कामांकरीता निविदा रक्कम रू.**23,28,512**/- करीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ टेंडर/16/2006 दि.11-7-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 02 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्या दि.26-7-2006 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | 34.5% जास्त दराने |
| 2. मे. उदय इंजिनिअरींग | 38% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.5% जास्त दराची निविदा मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. दि.6-9-2006 रोजी मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.5% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 19% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 34.5% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा **19% जास्त** दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे (**भाग 1**), सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लॅण्ड स्केपिंग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 19% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.112 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे (**भाग 2**), सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लॅण्ड स्केपिंग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करणेकरीता सा.बां.विभागाच्या सन **2004-05** च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.50,00,000/- चे प्रथम टप्प्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते, त्यास मा.आयुक्तांनी सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव शिफारस केलेली होती. मा.सर्वसाधारण सभेने दि.24.5.2006 रोजी ठराव क्र.260/2 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार टप्पा क्र.1 **भाग-2** मधील विविध कामांकरीता निविदा रक्कम रू.**19,68,960**/- करीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ टेंडर/16/2006 दि.11-7-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 05 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्या दि.26-7-2006 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | 15.786% जास्त दराने |
| 2. मे. एल.के.कन्स्ट्रक्शन | 16.99% जास्त दराने |
| 3. मे. ए.आर .कन्स्ट्रक्शन | 18.19% जास्त दराने |
| 4. मे. उदय इंजिनिअरींग | 34.5% जास्त दराने |

5. मे. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन 36.20% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.786% जास्त दराची निविदा मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. दि.6-9-2006 रोजी मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.786% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 9% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 15.786% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा **9% जास्त** दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे (**भाग 2**), सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लॅण्ड स्केपिंग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 9% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.113 :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको प्रशासकीय इमारतीमध्ये महानगरपालिकेचे कार्यालय स्थापीत करण्यासाठीची कामे करणे म्हणजेच अधिकारी, पदाधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र कॅबीन, कर्मचाऱ्यांसाठी पार्टीशन करून बसण्याची व्यवस्था करणे, शौचालयाची व्यवस्था, लँड स्केपींग, पेव्हींगब्लॉक, पार्कींग व्यवस्था इत्यादी कामे करणेस्तव सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.28,35,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.सर्वसाधारण सभेने दि.24-5-2006 रोजी ठराव क्र.261/3 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ टेंडर/19/06 दि.13-7-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 12 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्या दि.31-7-2006 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | 0.50% कमी दराने |
| 2. ए.आर .कन्स्ट्रक्शन | 1.00% जास्त दराने |
| 3. शहा कन्स्ट्रक्शन | 10% जास्त दराने |
| 4. एलोरा कन्स्ट्रक्शन | 18% जास्त दराने |
| 5. सुंदर कन्स्ट्रक्शन | 1% इसारा (EMD) रक्कम भरली नसल्याने निविदा उघडण्यात आलेली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराची निविदा रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराऐवजी अं.प.दरापेक्षा 1.5% कमी दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 0.50% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा **1.5% कमी** दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको प्रशासकीय इमारतीमध्ये महानगरपालिकेचे कार्यालय स्थापीत करण्यासाठीची कामे करणे म्हणजेच अधिकारी, पदाधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र कॅबीन, कर्मचाऱ्यांसाठी पार्टीशन करून बसण्याची व्यवस्था करणे, शौचालयाची व्यवस्था, लॅंड स्केपींग, पेव्हींगब्लॉक, पार्कींग व्यवस्था इत्यादी कामे करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.5% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.114 :**

औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांच्या वापरात असलेली वाहने जुनी झालेली आहेत. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड अधिकारी-अ, वॉर्ड अधिकारी-फ आणि उप अभियंता(पाणी पुरवठा-1) यांच्या वापरात असलेल्या जुन्या वाहनांची लिलाव पध्दतीने विक्री करण्यात येणार आहे. त्यामुळे वॉर्ड अधिकारी-अ,वॉर्ड अधिकारी-फ आणि उप अभियंता(पाणी पुरवठा-1) यांनी त्यांचेसाठी भाडेतत्वावर वाहने लावण्याची मागणी केली आहे.

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांचेकडील वापरात असलेली वाहने वॉर्ड अधिकारी-अ, वॉर्ड अधिकारी-फ आणि उप अभियंता(पाणी पुरवठा-1) यांना देण्यात यावी, म्हणजे या अधिकाऱ्यांसाठी वाहन भाड्याने लाउवण्याच्या खर्चात (वाहन भाडे) बचत होऊ शकेल. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांचेसाठी एकूण 3 Diesel Indica Car (DLX-TC) खरेदी करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते. कारण तीनही कार्यकारी अभियंत्यांना वेळी-अवेळी कामावर जावे लागते, त्यामुळे त्यांची वाहने चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच प्रिमिअर 118 NE Car, MH-20 M-7000 ही 2.50 लक्ष कि.मी. पेक्षाही जास्त चालली असून ती जुनी झालेली आहे. त्यामुळे हे वाहनही आता बदलण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे एकुण चार वाहनांची खरेदी करावी लागणार आहे. शहरातील टाटा मोटार्सचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स प्रा.लि., औरंगाबाद यांचेकडून प्राप्त दरपत्रकानुसार Diesel Indica Car (DLX-TC) ची किंमत खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| वाहनाची शो रूम किंमत | रू. 3,97,661/- |
| जकात कर | रू. 5,965/- |
| एकुण रक्कम | **रू.4,03,626/-** |

वरील प्रमाणे चार वाहनांची एकुण खरेदी किंमत रूपये 16,14,504/- इतकी होते. सदरील वाहन खरेदीचा खर्च अर्थसंकल्प 2006-07 मध्ये असलेल्या घसारा निधीच्या तरतूदीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

करीता कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांचे वापरातील वाहने वार्ड अधिकारी-अ, वॉर्ड अधिकारी-फ आणि उप अभियंता (पाणी पुरवठा-1) यांना देणे व एकुण 4 Diesel Indica Car (DLX-

TC) वाहने खरेदीसाठी येणारा खर्च रक्कम रूपये 16,14,504/- व सदरील वाहने टाटा मोटार्स चे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स प्रा.लि., औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : तीन-चार गाड्यांचा प्रस्ताव आलेला आहे. इतरही काही अधिऱ्यांसाठी लागणाऱ्या गाड्यांचा यात समावेश करण्यात यावा

मा. सभापती : प्रस्तावित केल्यानुसार कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांचे वापरातील वाहने वार्ड अधिकारी-अ, वॉर्ड अधिकारी-फ आणि उप अभियंता (पाणी पुरवठा-1) यांना देण्यास व एकुण 4 Diesel Indica Car (DLX-TC) वाहने खरेदीस मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नगर सचिव यांचे वाहनासाठी अर्थसंकल्पात तरतुद आहे. नगर सचिव, उप आयुक्त व इतर अधिकाऱ्यांसाठी Diesel Indica Car (DLX-TC) खरेदी करण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांचे वापरातील वाहने वार्ड अधिकारी-अ, वॉर्ड अधिकारी-फ आणि उप अभियंता (पाणी पुरवठा-1) यांना देणे व त्यांचेसाठी प्रस्तावित केल्यानुसार एकुण **4** Diesel Indica Car (DLX-TC) वाहने प्रति वाहन(कार) रू.**4,03,626/-** या दराने, टाटा मोटार्स चे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स प्रा.लि., औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास तसेच यासाठी येणारा खर्च रक्कम रूपये 16,14,504/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे इतर अधिकाऱ्यांकरीता Diesel Indica Car (DLX-TC) वाहने खरेदी करण्याकरीता स्वतंत्र प्रस्ताव आगामी स्थायी समिती सभेपुढे सादर करावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.115 :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे पाण्याची गढूळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2004-2005 च्या दरसुचीनुसार रू.14,42,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर अंदाजपत्रकास दि.16-8-2006 रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.66 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

औरंगाबाद शहर पाणी पुरवठ्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने तज्ञ समितीचे गठण करण्यात आले आहे. दि.17-8-2006 रोजी तज्ञ समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीत मा.अध्यक्ष तथा मुख्य अभियंता, म.जी.प्रा.मंडळ औरंगाबाद व इतर स.सदस्यांनी जलशुध्दीकरण प्रक्रीयेत वापरली जाणारी तुरटी ही ग्रेड-2 ऐवजी ग्रेड-1 ची वापरण्याचे शासन निर्देश असल्याचे सांगितले व ग्रेड-1 ची तुरटी वापरावी असे निर्देश दिले.

अनुषंगाने शासन निर्णय क्र.डब्ल्युक्युएम/प्रक्र/90/पापु-12/मंत्रालय, मुंबई-400032 दि.8-10-2003 प्राप्त केला असून निर्णयाच्या बाब क्र.6(ब) अन्वये तुरटी ही ग्रेड-1 ची असण्याबाबत निर्देश आहेत.

शासन निर्णय व तज्ञ समिती निर्देशानुसार फारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी पुरवठा करावयाच्या तुरटीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सुधारीत अंदाजपत्रकात तुरटी ग्रेड-1 चा समावेश करण्यात आला असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2005-2006 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.19,95,000/- चे अंदाजपत्रक तयारकरण्यात आलेले आहे. सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.24-8-2006 रोजी मान्यता दिलेली आहे.

आर्थिक वर्ष 2006-07 च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदी करीता तरतुद करण्यात आली आहे. करीता वर्ष 2006-07 मधील वार्षिक तुरटी खरेदीसाठी रूपये 19,95,000/- चे सुधारीत अंदाजपत्रक विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे पाण्याची गढूळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,95,000/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.116 :</u>**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बिबी का मकबरा च्या मागील डोंगर रांगेत बौध्दलेणी असून, लेणीच्या पायथ्याशी प्रज्ञाप्रसार धम्म संस्कार केंद्र आहे. त्यानिमित्ताने पर्यटक व शहरातील नागरीक हे लेणी बघण्यास तसेच धम्म संस्कार केंद्रात येत असतात. तसेच विजयादशमीच्या दिवशी बौध्दलेणी येथे दरवर्षी मोठ्या संख्येने भाविकजन भेट देत असतात व त्या दिवशी रात्री उशीरा पर्यंत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन तेथे होत असते. या भागात पुरेशी विद्युत व्यवस्था नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. सबब सदर परिसरात हायमास्ट दिवे लावण्यासाठी प्रज्ञाप्रसार धम्म संस्कार केंद्राचे भन्ते श्री विशुध्दानंद बोधी महाथेरो व इतर यांनी या विभागात भेट देऊन अर्ज सादर केलेला आहे.

दिनांक 22.9.2006 रोजी स्थायी समिती सभेत स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांनी बौध्दलेणी परिसरात हायमास्ट लाईट बसविण्याबाबत मुद्दल उपस्थित केला. प्रकरणी याबाबत मा.सभापती(स्थायी समिती) व मा.आयुक्त यांची सविस्तर चर्चा झालेली असून, स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांनी विजयादशमी पुर्वी काम पूर्ण करण्याची मागणी केली होती. चर्चेअंती बौध्दलेणी परिसरात हायमास्ट लाईट बसविण्याच्या कामास मा.सभापती व मा.आयुक्त यांनी तत्वतः मंजुरी दिलेली आहे. त्यानुषंगाने बौध्द लेणी परिसरात 16 मी. उंचीचा हायमास्ट बसविण्याकरीता रक्कम रू.3,36,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर काम हे विजयादशमी पुर्वी करून घेणे असल्याने, काम हे उपलब्ध कंत्राटदार यांचेकडून करून घ्यावे लागेल.

तरी बौध्द लेणी परिसरात हायमास्ट बसविण्याचे अंदाजपत्रक र.रू.3,36,000/- ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अंतर्गत मान्यता होणेस्तव तसेच उपलब्ध कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकीय दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बौध्द लेणी परिसरात हायमास्ट बसविण्याचे कामासाठीच्या रक्कम रू.3,36,000/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम विजयादशमीपुर्वी करून घ्यावयाचे असल्याने, मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अंतर्गत उपलब्ध कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकीय दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.117 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी, सिडको येथे सभागृह बांधणे करीता सा.बां.खात्याचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.14,57,450/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीसमोर सादर करणेस शिफारस केली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षाअंतर्गत "व्यापारी संकुले व इतर इमारती" या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,57,450/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी, सिडको येथे सभागृह बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,57,450/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद